# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**

पत्र क्र.रासेयो/ ११८८ / २०१५—१६
दिनांक : १५ मार्च, २०१६

प्रति,

प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठाशी अधिनस्त सर्व महाविद्यालये,

संदर्भ : राज्य संपर्क अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र शासन यांचे रासेयो २०१६/(५४/१६)—साशि ७, दिनांक ११ मार्च, २०१६ चे पत्र.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये राज्यातील पाण्याचा संचय, संवर्धन, पाण्याचा पुर्नवापर, सुयोग्य वापर तसेच पाण्याचे प्रदुषणास प्रतिबंध करण्याच्या हेतूने दिनांक १६ मार्च ते २२ मार्च, २०१६ हा 'जल जागृती सप्ताह' दरवर्षी साजरा करण्याबाबत दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असुन जलसंपदा विभागाच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे.

जलसप्ताहाच्या कार्यक्रमाच्या आयोजनातुन सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये पाण्याचे महत्व, पाण्याचे सवंर्धन, प्रदुषण, पाण्याची गुणवत्ता याविषयी जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये वत्कृत्व स्पर्धा, व्याख्याने, जलसाहित्य संम्मेलन, प्रदर्शन, जलसंपदा प्रकल्पांना, जलशुध्दीकरण प्रकल्पांना भेटी देणे असे उपक्रम राबवावेत.

सदर सप्ताह आयोजनानंतर आयोजित उपक्रमांचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ कार्यालयात पाठविण्यात यावा हि विनंती.

आपला विश्वासू,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभागे